I O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): लातूर    **P.S.**(ठाणे): निलंगा

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0112    **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):22/04/2025 22:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार    **Date From** (दिनांक पासून): 22/04/2025

**Time Period** (कालावधी): पहर 5    **Date To** ( दिनांक पर्यंत): 22/04/2025

**Time From** (वेळेपासून): 13:43 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 13:43 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 22/04/2025    **Time** (वेळ): 22:23 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 021

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 22/04/2025 22:23 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

दक्षिण, 1 किमी    **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): असलेल्या हटेल साई टी पईंट म,निलंगा तहसिल कार्यालयाच्या गेट,निलंगा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सौदागर बाबुराव शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अजनी बु,शिरूर अनंतपाळ,शिरुरअनंतपाळ,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अजनी बु,शिरूर अनंतपाळ,शिरुरअनंतपाळ,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9579157251

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल बालाजी मरे | | | 1. शाबितवाडी ,निलंगा, कासारशिर्शी,लातूर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,000/रू. मागणी करून निलंगा तहसिल कार्यालयाच्या गेटचे | 1,000.00 |

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | बाजूस असलेल्या हटेल साई टी पईंट मध्ये पंचास | |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

1,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी सौदागर बाबुराव शिंदे, वय 43 वर्षे, व्यवसाय शेती, रा. अजनी (बु.) ता. षिरूर अनंतपाळ, जि. लातूर मो.नं. 9579157251, आधार कार्ड नं.5709 2860 6108 असा आहे. मी सौदागर बाबुराव शिंदे, वय 43 वर्षे, व्यवसाय शेती, रा. अजनी (बु.) ता. षिरूर अनंतपाळ, जि. लातूर मो.नं. 9579157251, आधार कार्ड नं. 5709 2860 6108 असा आहे.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 21/04/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री संतोष बर्गे साहेब यांच्या कार्यालयात जावून त्यांची भेट घेवून एका इतर लोकसेवक यांचे विरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितले होते. त्यांनी मला दिनांक 22/04/2025 रोजी 11.00 वा. अनसरवाडा पाटी,ता.निलंगा जि.लातूर येथील निलंगा-औराद जाणारे मेन रोडचे बाजूस असलेल्या हनुमान मंदिरा जवळ सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले होते.

त्याप्रमाणे दिनांक 22/04/2025 रोजी सकाळी 11.00 वा. सुमारास वरीलप्रमाणे सांगितलेल्या ठिकाणी हजर आलो. तेथे पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब हे खाजगी वाहनाने त्यांचे कर्मचारी व दोन पंचासह हजर होते. त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन त्यांचे समक्ष माझे नाव, गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगीतली. ती खालीलप्रमाणे.

"मी वरीलप्रमाणे राहणार असुन, मी माझी आई भारतबाई सुभाष शिंदे रा अजनी बु. ता शिरूर अनंतपाळ जि लातूर हिस मौजे शिरोळ (वां), ता.निलंगा जि.लातूर येथील सर्वे/गट नंबर 377 सर्वे/गट नंबर 369 मधील वडीलोपार्जित शेत जमीनीचा हिस्सा मिळण्यासाठीचा मा. दिवाणी न्यायालय,निलंगा येथे आरसीसी नं.117/2009 अन्वये दिवाणी दावा दाखल केला होता. त्यामध्ये मा. न्यायालयाने माझी आई हिचे बाजुने दि.31/07/2013 रोजी निकाल दिला आहे. सदर निकालाविरूध्द यातील गैरअर्जदार माझे आईचे भाऊ श्री बब्रुवान जाधव यांनी वेळोवेळी मा. उपविभागीय अधिकारी निलंगा, अपर जिल्हाधिकारी लातूर व मा. वरीष्ठ दिवाणी न्यायालय, निलंगा येथे अपिल दाखल केले होते ते सर्व अपिल फेटाळण्यात आले आहेत. सदर आदेशा विरूध्द गैरअर्जदाराने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं. 9870/2023 अन्वये मा. दिवाणी न्यायालय, निलंगा यांनी दिलेल्या आदेशा विरूध्द कोर्ट डिक्रीच्या अंमलबजावणीस तात्पुरती स्थगिती मिळण्यासाठी अपिल केले असता मा. उच्च न्यायालयाने सदरचे अपिल हे दिनांक 03/01/2025 रोजी फेटाळले असुन मा. दिवाणी न्यायालय, निलंगा यांनी दिलेले आदेश कायम ठेवले आहेत. त्यावरून तक्रारदाराने तिची आई भारतबाई सुभाष शिंदे यांचे नावाने दिनांक 27/03/2025 रोजी मा.तहसिलदार यांचेकडे सदर जमिनीचा ताबा मिळण्यासाठी अर्ज केला असता सदर अर्जावर मा.तहसिलदार, निलंगा यांनी निर्गमित केलेल्या आदेशाची प्रत देण्यासाठी म्हणुन 1,000/- रूपयाची मागणी केली आहे. इतर लोकसेवक श्री मरे हे मागत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी व माझे आईची खात्री झाली. माझी आई ही वयोवृध्द असून ती लातूरला येवू शकत नसल्याने आईचे वतीने मी लाच मागणीची तक्रार देण्यासाठी ला.प्र.वि. कार्यालय, लातूर येथे आलो आहे.

मी आज रोजी माझे वरील कामासाठी तहसिल कार्यालय, निलंगा येथे श्री मरे यांची भेट घेणार आहे. सदर भेटी दरम्यान इतर लोकसेवक श्री मरे यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर

कार्यवाही होणेस विनंती आहे. माझा संबंधीत लोकसेवक यांचेशी कसलाही आर्थिक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही अथवा माझे त्यांचेशी काही वैर नाही.'' अशा आशयाची मी दिलेली तक्रार सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री संतोष बर्गे साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिल कार्यालय, निलंगा येथील इतर लोकसेवक कोतवाल श्री मरे यांनी मला माझ्या वर नमुद कामाकरीता म्हणुन लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 11.55 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळ्यात अडकावुन तहसिल कार्यालय, निलंगा येथे इतर लोकसेवक कोतवाल श्री मरे बसत असलेल्या ठिकाणी जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक हे अनसरवाडा पाटी,ता.निलंगा जि.लातूर येथील निलंगा-औराद जाणारे मेन रोडचे बाजूस असलेल्या हनुमान मंदिराजवळ आडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 बालाजी तायप्पा चव्हाण असे तहसिल कार्यालय, निलंगा येथे जावुन फिकट गुलाबी रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व काळया रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे इतर लोकसेवक श्री मरे असल्याचे पंचास इशा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली. इतर लोकसेवक श्री मरे यांनी माझे वरील नमुद कामाच्या अनुषंगाने पंचासमक्ष माझेशी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान मी इतर लोकसेवक श्री मरे यांना म्हणालो.... नमस्कार ओ मरे साहेब ... त्यावर कोतवाल मरे म्हणाले...नमस्कार नमस्कार... त्यावर मी म्हणालो... सर कसं कसं केलो?...त्यावर कोतवाल मरे म्हणाले... सगळच करावं लागतयं... याची झेरॉक्स आणा...... त्यावर मी म्हणालो... हं.... त्यावर कोतवाल मरे म्हणाले.... वीसची विमल घेवून या येताना.... माझं नाव सांगा देतय.... त्यावर मी म्हणालो... तेच म्हणलालाव......त्यावर कोतवाल मरे म्हणाले.... अन हजार पाचशे खर्चायला घेवून या येताना ... त्यावर मी म्हणालो.... काय म्हणलो?... त्यावर कोतवाल मरे म्हणाले... हजार पाचशे खर्चायला आणा म्हणलो येताना....त्यावर मी म्हणालो.... पैसे तर जवळ नाहीत साहेब..... त्यावर कोतवाल मरे म्हणाले.... काकानं बोललाय मला..... काका वकीलांन.... त्यावर मी म्हणालो... हं..... त्यावर कोतवाल मरे म्हणाले... हं मग ते कोण द्यावावं पैसे....... आता पत्रव्यवहार काढलावं..... ऑर्डर काढून..... एसी केलाव...... गिरधावर ला आज ना नसता उद्या पोहोचल सगळं.... पोलीस स्टेशन हे सगळचं दिलावं कॉपी .... तुमची वाट सुदीक बघाय नाही मी......त्यावर मी म्हणालो.... आत कोणाकून तर आणावं लागल मला..... त्यावर कोतवाल मरे म्हणाले... आता काहीबी करा...... मला वरी झेरॉक्स द्यायचय.... आणून द्या मला..... त्यावर मी म्हणालो.... नाही.....येवढयावर भागायचं का? ....त्यावर कोतवाल मरे म्हणाले... ही झेरॉक्स प्रत घ्यायची ... नेवून गिरधावर साहेबाला फक्त दाखवा..... त्यावर मी म्हणालो.... अजून इकडून तिकडून कुणाकडून तर पैसे करावं लागतेत.... म्हणून म्हणलालावं...... त्यावर कोतवाल मरे म्हणाले... अं..... असे म्हणून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यावर मी म्हणालो... येतो मग थोडया वेळाने ... असे म्हणून मी व पंच क्रमांक 1 चव्हाण असे तेथुन निघून बाहेर येवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12:40 वाजताचे सुमारास आलो असता पोकॉ कोंडरे यांनी माझे कडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 चव्हाण यांना लाचेची मागणीच्या अनुषंगाने माझ्यात व कोतवाल मरे यांच्यात काय बोलणे झाले? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 चव्हाण यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वानी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कोंडरे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व कोतवाल मरे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषण हे पंच क्रमांक 1 चव्हाण यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन कोतवाल मरे यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 1,000/- रुपये लाचेची स्वतः मागणी करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 1,000/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले.

पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मला कोतवाल मरे यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझे कडील 500/-रुपये दराच्या 02 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,000/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मला व पंचाना अँन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1256 गंभीरे यांनी अँन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर

आपल्या गळयातील गमजा काढुन तोंड पुसणे बाबतचा सुनियोजीत ईशारा करणेबाबत सांगण्यात आले. पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 13.24 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन तहसील कार्यालय, निलंगा येथे कोतवाल मरे बसत असलेल्या ठिकाणी जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक तहसील कार्यालय निलंगा च्या आजुबाजुस कोणाच्या नजरेत येणार नाही असे अडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 चव्हाण असे तहसील कार्यालय निलंगा जवळ जावुन माझे मोबाईल नंबर 9579157251 वरून कोतवाल मरे यांचे मोबाईल नंबर 8788414504 वर पंच क्र. 01 चव्हाण यांचे समक्ष स्पीकरमोड कॉल करून तहसील कार्यालय निलंगा इमारतीच्या बाजुस असलेल्या साई टी पाँईंट येथे येण्यास सांगीतले असता, कोतवाल मरे हे साई टी पाँईंटवर आल्यावर मी त्यांना म्हणालो.... बरं साहेब.... घ्या मला जायचयं ओ... देवु का?... त्यावर कोतवाल मरे म्हणाले... हं... त्यावर मी म्हणालो... हजार रूपये आहेत मोजून बघा.... असे म्हणुन 500/-रुपये दराच्या 02 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,000/-रुपये कोतवाल मरे यांचे समक्ष धरले असता कोतवाल मरे यांनी माझे कडुन 13.43 वाजण्याच्या सुमारास पंचासमक्ष सदरची लाचेची रक्कम ही त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन काळया रंगाच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवली... त्यानंतर मी लगेच नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. लगेच सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब, पंच क्र. 02 सन्मुखराव व सापळा पथकातील सदस्यासह माझे जवळ आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कोंडरे यांचेकडे दिले ते त्यांनी 13.45 वाजण्याच्या सुमारास घेवुन बंद केले. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी पंच क्रमांक 1 चव्हाण यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 चव्हाण यांनी समोर फिकट गुलाबी रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व काळया रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे कोतवाल मरे असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर उजव्या हाताने स्विकारुन काळया रंगाच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवली असलेबाबत सांगितले. मी वर सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 चव्हाण यांनी सांगीतली. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र कोतवाल मरे यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव राहुल बालाजी मरे, वय 37 वर्षे, पद कोतवाल, वर्ग-4, नेमणुक तहसील कार्यालय, निलंगा ता. निलंगा, जि. लातूर मुळ रा. शाबीतवाडी ता. निलंगा जि. लातुर असे असल्याचे सांगितले. पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी पंच क्रमांक 2 सन्मुखराव यांचे हस्ते कोतवाल मरे यांच्या जवळील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 चव्हाण यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर कोतवाल मरे यांना ताब्यात घेवुन तेथील आवश्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली आहे.

तरी यातील इतर लोकसेवक राहुल बालाजी मरे, वय 37 वर्षे, पद कोतवाल, वर्ग-4, नेमणुक तहसिल कार्यालय, निलंगा जि. लातूर मुळ रा. शाबितवाडी ता. निलंगा जि. लातुर यांनी माझे आई सौ. भारतबाई सुभाष शिंदे रा. अजनी बु. ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर हिचे वडीलोपार्जित जमिनीचा ताबा मिळण्यासाठी मा.तहसिलदार यांनी निर्गमित केलेल्या आदेशाची प्रत देण्यासाठी म्हणुन दि.22/04/2025 रोजी 1,000/-रू. मागणी करून निलंगा तहसिल कार्यालयाच्या गेटचे बाजूस असलेल्या हॉटेल साई टी पॉईंट मध्ये 13:43 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोहेकॉ/आलुरे यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली आहे. ती मी वाचुन पाहिली असता, मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Rajashree Sidhapa Terani
**Rank** (पद): Dy. SP (Deputy Superintendant **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

परिविक्षाधीन पोलीस उप अधिक्षक
**Signature of Officer in charge, Police Station** पोलीस स्टेशन निलंगा
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajashree Sidhapa T
**Rank**(पद): Dy. SP (Deputy Super
**No.**(सं.):

ठाणे अमलदार
पोलीस ठाणे निलंगा